**नियमित दिवाणी मुकदमा नंबर ३८६/२०१७**
**निशाणी क्रमांक ५२ वरील आदेश**

१. सदरचा अर्ज त्रयस्थ इसम रविंद्र सुधाकर दीक्षित याने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० प्रमाणे त्यांना दाव्यामध्ये पक्षकार करुन घेणेबाबत आदेश होणेसाठी दिलेला आहे.

२. सदर अर्जास वादी यांनी निशाणी ५९ वर पुरसीस दाखल करुन नि.५७ वरील म्हणणे प्रस्तुत अर्जालादेखील वाचण्याबाबत न्यायालयास विनंती केली आहे. नि.५७ मध्ये वादीने हरकत घेतली आहे की, अर्ज मान्य व कबूल नाही. दाव्यामध्ये कोणास पक्षकार करावयाचे हे वादीवर अवलंबून आहे. त्रयस्थ इसमाविरुध्द वादीची कोणतीही मागणी नाही. वादी हे दाव्याच्या कामी आवश्यक पक्षकार नाहीत. त्यामुळे अर्ज नामंजुर करण्यात यावा.

३. वादी व त्रयस्थ इसमातर्फे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

४. याकामी नि.१७ वरील आदेशाने यापुर्वीच सुनिल बाबुराव गिड्डे या इसमास दाव्याच्या कामी प्रतिवादी क्रमांक ३ म्हणून सामील केलेले आहे. त्रयस्थ इसम हा शखंभरी अपार्टमेन्ट मधील रहिवाशी आहे. दावा हा सदर अपार्टमेन्टमधील सामाईक मिळकतीसंदर्भात दाखल केला गेलेला आहे. त्यामुळे सदर त्रयस्थ इसम हा याकामी त्याचे वाद मिळकतीमध्ये हितसंबंध गुंतले असल्याने आवश्यक पक्षकार ठरतो. त्यामुळे दोन्ही पक्षातील वादाचे अंतिम निराकरण होण्यासाठी त्याला प्रतिवादी क्र.५ म्हणून दाव्यात सामील करणे जरुरीचे ठरते. त्याला दाव्यात प्रतिवादी म्हणून सामील केल्यास वादीचे काहीही नुकसान होत नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१. निशाणी ५२ मंजुर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी प्रतिवादी क्रमांक ५ म्हणुन रविंद्र सुधाकर दीक्षित यांना

दाव्यात सामील करुन, दावा दुरुस्तीची प्रत न्यायालयाकरिता व प्रतिवादीकरिता या न्यायालयात पुढील तारखेपावेतो हजर करावयाची आहे.

सही/-

सांगली. (के.ए.भेंडवडे)

दिनांक १९/१०/२०१८ सहावे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,

सांगली